# चिपळूण नगर परिषद.
# फेर जाहिर निविदा

चिपळूण नगर परिषदेचे खालील काम करावयाचे आहे. त्यासाठी पात्र निविदा धारकांकडून दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत. निविदा दिनांक १८/१०/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सर्वसाधारण शाखेतील प्रशासकिय अधिकारी यांचे चेंबरमधील निविदा पेटीमध्ये टाकाव्यात.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदेसोबत भरावयाची रक्कम | कामाची मुदत | फॉर्मची किंमत | निविदा धारकांची पात्रता. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | चिपळूण नगर परिषद हद्दीतील पथदिव्याची दुरुस्ती देखभाल करणे, | ११,५०,०००/- | २०,०००/- | १ वर्ष | १५००/- | १. म.रा.वि.वि.कं. सार्व. बांधकाम विद्युत विभाग यांचे कडील नोंदणीचा दाखला<br>२. केलेल्या कामाचा अनुभवाचा दाखला |
| २ | नगर परिषद हद्दीतील कोंडवाडा सेवा तत्वावर चालविणे (शहरातील उनाड गुरांचा बंदोबस्त करणे,कोडवाडयाची कारवाई अधिनियमातील तरतुदी प्रमाणे करणे) | - | २०००/-- | कामाचा-आदेश मिळाल्या पासून १ वर्षे | -१००/- | - |

१. निविद फॉर्म नगरपरिषद लेखा विभागात विहीत नमुन्यातील अर्जासोबत रकाना ६ मधील फॉमची किंमत रोखीने भरल्यानंतर अभिलेख व भांडार विभागात दिनांक १५/१०/२०१० रोजी सायं. ४.०० वाजेपयंत उपलब्ध होतील.

२. विविदा दोन लखोटा पध्दतीने भरावयाची असून लखोटा क्र.१ मध्ये पात्रता संबंधी कागदपत्रे तसेच निविदा अनामत रकाना क्र.४ मधील रक्कमेचा मुख्याधिकारी चिपळूण नगर परिषद यांचे नांवे असलेला डि.डी. अथवा ठेव पावती किमान १ वर्षे मुदतीची ठेवणे आवश्यक आहे.

३. निविदा पुर्व बैठक दिनांक १६/१०/२०१० रोजी सायं. ४.०० वाजता मुख्याधिकारी चेंबरमध्ये होइल

४. निविदा लखोटा क्र.१ दिनांक १८/१०/२०१० रोजी सायं.४.०० वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येईल.

५. लखोटा क्र.१ मधील पात्र निविदाधारकांची यादी त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता नगर परिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल व त्याबाबत आक्षेप दिनांक १९/१०/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारणेत येतील.

६. पात्र निविदाधारकांच्या निविदा दिनांक १९/१०/२०१० रोजी सायं.४.०० वा.उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येतील.

७. निविदा भरणेपुर्वी फॉर्म व प्रारुप करारनामामधील अटीचा अभ्यास करून निविदाधारकांनी निविदा भरावयाची आहे. निविदा अपूर्ण आढळल्यास व लाखेने सिल न केलेल्या निविदा फेटाळण्यात येईल व दरपत्रक उघडले जाणार नाही.

८. सर्व अथवा कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवणेत आलेला आहे.

९. निविदे संबंधी आवश्यक अटी व शर्ती आरोग्य विभागामध्ये आरोग्य निरीक्षक यांचेकडे पहावयास मिळतील.

१०. काम नं. १ साठी स्ट्रिटलाईट सेक्शन बंद झाल्यानंतर त्वरीत चालू करुन देणे. व बंद दिव्याबाबत नागरीकांकडून येणारे तक्रारीचे २४ तासचे आत निवारण करणे

मुख्याधिकारी अध्यक्ष
चि प ळू ण न ग र प रि ष द.

**चिपळूण नगर परिषद हद्दीमधील स्ट्रिटलाईटची दुरुस्ती व देखभाल ठेकेदार पध्दतीने करणेबाबतच्या कामा बाबत अटी व शर्ती खालिल प्रमाणे आहेत.**

१.स्ट्रिटलाईटची देखभाल व दुरुस्ती बाबत ठेकेदार महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कपनी किंवा सार्वजनिक बांधकाम विदयुत विभाग यांचेकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२.चिपळूण नगर परिषद हद्दीमधील प्रभागामधील सर्व स्ट्रिटलाईटची दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक आहे.

३.नगर परिषद हद्दीमध्ये विविध प्रभागामध्ये ठरवील त्याप्रमाणे नविन स्ट्रिटलाईट पोलवर फिक्चर बसविणे.

४. पुर्ण स्ट्रिटलाईट (सेक्शन) बंद असल्यास त्याच दिवशी चालू करणे बंधनकारक आहे.

५.शहरामधील ५ टक्के पेक्षा जास्त स्ट्रिटलाईट बंद असल्यास ॲव्हरेज प्रमाणे सदरच्या बिलाची रक्कम ठेकेदर यांच्या बिलामधून कपात करणेत येईल.

६.नगर परिषेने दिलेले काम १ वर्षे पर्यंत करणे आवश्यक आहे.

७.प्रत्येक महिन्याचा खर्चाचा आढावा घेवून त्याप्रमाणे पुर्ण मुल्यांकन करणेत येईल व त्याप्रमाणे नगर परिषद निर्णय घेईल.

८. स्ट्रिटलाईटच देखभाल व दुरुस्तीचे दर महाचे बिल नगर परिषद प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत देईल.

९.नगर परिषदेने सौर उर्जाच्या/पॉवर गॅस किटचा वापर सुरु केल्यास त्या पोलचे बिल ॲव्हरेजप्रमाणे कमी करणेत येतील.

१०.स्ट्रिटलाईट दुरुस्ती व दुखभाल या कामामध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास नगर परिषदेचा निर्णय अंतीम राहील.

११.स्ट्रिटलाईट दुरस्ती व दुखभाल साठी लागणारे आवश्यक मटेरीयल आयएसआय मार्कचे असले पाहीजे. तसेय याबाबत कोणत्या कंपनीचे मटेरीयल वापरणेचे यासंबधी सेवापुरवठा धारकाला सुट असेल.

१२.महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी यांचेकडून आवश्यक तो परवाना सेवापुरवठा धारक यांनी घेणे आवश्यक आहे.

१३.ठेकेदार यांचे कर्मचारी यांचा कोणताही हक्क नगर परिषदेच्या सेवा हक्काची असणार नाही.

१४.स्ट्रिटलाईटचे काम करतेवेळी कोणताही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

१५.बंद स्ट्रिटलाईटची नोंद व केलेल्या कामाची रोजची नोंद आरोग्य निरिक्षक यांचेकडे सादर करणेची आहे.

१६.बंद दिव्याबाबत नागरीकाकडून येणारे तक्रारीचे निरसन २४ तासचे आत करणेचे आहे. दिवे दुरुस्तीसाठी स्वताचे मालकीची शिडी असणे आवश्यक आहे.

१७. ठेकेदार यांनी हलगर्जीपणा केल्यास त्याबाबत जास्तीजास्त दोनवेळा सुधारणा

करणेबद्दल संधी देणेत येईल व त्यानंतर सुधारणा न झाल्यास एकतर्फी ठेका रद्द करणेचा नगर परिषदेला अधिकार असेल. व त्यामुळे होणारे नगर परिषदेचे नुकसान ठेकेदारांची अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०, १५१,१५२,१५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

१८.ठेकेदार यांना निविदा देकाराव्यतीरीक्त कोणताही शासकिय कर बिलावर आकारता येणार नाही. शासकिय सर्व कर आवश्यक असल्यास आवश्यक ते परवाने सेवा पुरवठाधारकांने स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणतीही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

१९.ठेकेदार आवश्यकतेप्रमाणे अपेक्षित कामासाठी प्रशिक्षीत कर्मचारी,गाडया,मजुर,तांत्रिक कर्मचारी लावता येतील. मात्र कामगार कायदयांची व किमाल वेतन कायदयाची काटेकोर अंमलबजावणी करणेची जबाबदारी ठेकेदार यांची असेल.

२०.ठेकेदार यांनी अेकदा देकार भरल्यानंतर बाजारभावात बाढ झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांनी देकाराची मुदत संपेपर्यंत कोणतीही भाववाढ देण्यात येणार नाही.

२१.करारनामा योग्य मुल्यांच्या मुद्रांकित कागदपत्रावर व यासाठी होणारा खर्च निविदा धारक यांनी स्वतः करावयाचा आहे.

२२.शासन नियमानुसार कामगारांचा विमा उतरवणेची जबाबदारी ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहील.

२३.या व्यतिरिक्त शासकिय व नगर परिषद नियमानुसार अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचा अधिकार नगर परिषदेला राहील.

२४. वाढीव वस्तीमध्ये जादा पोल टाकून देणे व त्यावर फिक्चर्स बसवून देणे.

२५ कामाचा करारनामा करते वेळी ३ टक्के सुरक्षा अनामत घेणेत येईल. व बिलातुन ७ टक्के सुरक्षा अनामत कापुन घेण्यात येईल. तसेच शासनाचे इतर कर (आयकर) बिलामधुन कापुन घेणेत येईल

वरील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक व मान्य असल्याबद्दल मी खाली सहि करीत आहे.

दिनांक :-

निविदाधारकाची सहि.
कंपनी/संस्था असल्यास त्याचा रबर स्टॅम्प
आवश्यक